नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/01/2024 (रविवार) सकाळ

## पोलीस स्टेशन सावनेर पोलीसांकडून अट्टल घरफोडीचे गुन्हेगार अटक करून त्यांचेकडुन ०८ गुन्हे उघड करून चोरीचा मुददेमाल हस्तगत

पोलीस स्टेशन सावनेर येथे दाखल झालेले अप क्र., २८/२४ कलम ४५८, ३८०, ५११ भादवी सहकलम ४, २५ आर्म ॲक्ट मध्ये अटक केलेले आरोपी १) आकाश विलास लांजेवार वय २४ वर्ष, २) सुरज संजय कोहळे वय २१ वर्ष दोन्ही रा. नंदनवन झोपडपटटी नागपुर यांना अटक करून त्यांचे कडुन घरफोडी करने करीता वापरलेली कार आय २० क्रमांक एम.एच– ०२/ ९७२५, ,०१ तलवार व घरफोडीचे साहीत्य असा १,००,३९०/– रू– चा मुददेमाल जप्त करून त्यांचे कडुन पाटणसावंगी व सावनेर परिसरातील पोलीस स्टेशन सावनेर येथे दाखल असलेले घरफोडीचे ८ गुन्हे उघड करून चोरी केलेल्या मालापैकी सोनार अंकुश गणपतराव नेरकर वय ३३ वर्ष रा. दिघोरी नागपुर व सचीन दत्तात्रय कावळे रा. इतवारी नागपुर यांचेकडुन १८.९९ तोळे सोने व ४ तोळे चांदीचे दागीने किमंत ६,७९,३४२/– रूपये असा ,एकुण किंमती ७,७९,७३२/– रूपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनिल मस्के साहेब, पोलीस निरीक्षक श्री रवीन्द्र मानकर, सहायक पोलीस निरीक्षकक शिवाजी नागवे, शरद भस्मे, चालक सफौ राजु कडु, पोलीस हवालदार रवीन्द्र चटप, अतुल खोडनकर अविनाश बाहेकर, माणिक शेरे, चालक पोहवा प्रितम पवार, पोलीस नाईक रंजन काबळे, पो शि अंकुश मुळे, अशोक निस्ताने यांनी केली आहे.



## सुगंधित तंबाखुची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील हेटी ते तेल कामठी रोड ने कंटेनर मध्ये प्रतिबंधित सुगंधी तंबाखु घेवुन जात आहे अशी गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली वरुन सदर कंटेनर चा पाठलाग केला असता सदर कंटेनर चालक हा कंटेनर सोडुन पळुन गेला कंटेनर क्रमांक आर जे ११ जी सी ५८१३ ची पाहणी केली असता कंटेनर मध्ये १०० गेरु रंगाचे प्लास्टिक बोऱ्यामध्ये ३३ लाख ७५ हजार रुपयाच्या प्रतिबंधित सुगंधी तंबाखू व पान मसाल्याच्या माल व कंटेनर किंमत ३० लाख रुपये असा एकूण ६३ लाख ७५ हजार रु. चा माल मिळून आला कंटेनर क्र. आर जे–११ जी. सी–५८१३ चा चालक व मालक यांचे विरुध्द कलम ३२८, १८८, २७२(अ), २७३ भा.द.वी. सहकलम २६(१), २६(२), (iv),२७(३),(E),३०(२),(A), ३(१),(iii)(अ), ५९ अन्न सुरक्षा अधिनियम २००६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २०/०१/२०२४ रोजी रात्री २२.४५ वा. दरम्यान पो. स्टे. भिवापूर हद्दीत स्टाफसह पेट्रोलिंग करीत असताना नीलज फाट्याकडून भिवापूरकडे १० चक्का टिप्पर ट्रक क्र. MH-40/AK-9891 हा येताना दिसला त्याचा पाठलाग करून भिवापूर तहसील कार्यालय टी पॉईंट भिवापूर येथे थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती मिळून आल्याने ट्रक चालकास सदर ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने टिप्पर ट्रक क्र. MH-40/AK-9891 किं. रु. २०,००,०००/— व त्यामध्ये ०६ ब्रास रेती किं. रु. ३०,०००/— असा एकूण रु. २०,३०,०००/— चा मुद्देमाल जप्त करून सदर टिप्पर चालक /मालक यांचेविरुद्ध कलम ३७९ भा. द. वी. सहकलम ४८(७),४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४,२१, खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करणेत आलेला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर